महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
Maharashtra Electricity Regulatory Commission
माहितीचा अधिकार
स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर

MERC/ADM/RTI/023/2022/**0207** Dt. 09.05.2022

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत (जेष्ठ नागरीक),
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नं. ४, उल्हासनगर-१,
जि. ठाणे - ४२१००१

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २१.०४.२०२२ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.२५.०४.२०२२ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | आपल्या अधिन ग्राहक तक्रार न्यायमंच कल्याण झोन विज ग्राहकाच्या तक्रारी न्यायव्यवस्थेसाठी आहे. जर ग्राहक न्यायमंचाच्या न्यायधिशांनी विज कायदा २००३ च्या विरूध्द कंपनीच्या बाजुने नियमाच्या विरूध्द आदेश दिला तर त्यावर नियमानुसार आपल्या कार्यालयात तक्रार आल्यावर काय कारवाई करण्यात येते त्याची जिआर प्रत मिळावी. | आपण विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरूपाची आहे तसेच सदर कायदा हा काल्पनिक प्रश्न उपस्थित करण्याची किंवा जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नांची उत्तरे शोधून देणे अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ २(फ) नुसार माहिती मागावी जेणेकरून आपणांस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आपणांस माहिती उपलब्ध करून देणे सोयीचे होईल** |
| २ | आपल्या अधिन ग्राहक तक्रार न्यायमंच कल्याण असून केस नंबर २२१० चा आदेश विज कायदा २००३ नियम ५६(२) मध्ये येत असताना त्याविरूध्द कंपनीच्या बाजुने दिला आहे तो असे की मार्च २०१८ ते जुन २०१८ पावेतो पिडी होते. त्याची रक्कम त्याचा पुरावा नाही. रक्कम रेकॉर्डवर नाही व दि. २८.०२.२०२१ ला बिल देण्यात येते हे नियमबाद २००३, नियम ५६(२) पेज नंबर ३० मध्ये स्पष्ट असताना संगनमत करून कंपनीच्या बाजुने | आपल्या जर वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारी असतील तर त्यासाठी आयोगाने ग्राहक तक्रार निवारण मंच (CGRF) या यंत्रणेची निर्मिती केलेली आहे. प्रकरणारुप ग्राहक त्यांच्या तक्रारीसाठी या यंत्रणेकडे दाद मागू शकतो. सदर विनियम [महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२०] आयोगाच्या |

| | | |
|---|---|---|
| | आदेश दिला म्हणून काय कारवाई आपले कार्यालय करते त्याची माहिती स्वाक्षरी प्रत मिळावी. | www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहेत. |
| ३ | असाच केस नं. २२०६ मिटर हे विजय सितलानीच्या भावाच्या नावे आहे व दि.२.०२.२०१४ पासून २३.०२.२०१८ पावेतो मिटर पिडी होते. पण मिटर बाहेर होते लायसेन्सी अधिकाऱ्याच्या संगनमतमुळे चालू होते त्याची रक्कम ऑगस्ट २०२१ ला दाखविण्यात आली त्यामागे ० आहे तर विज कायदा २००३ नियम ५६(२) च्या नियमाने घेता येते का त्याची माहिती स्वाक्षरी प्रत मिळावी. | माहिती अधिकार अधिनियम, २००५ २ (च) नुसार माहिती मागावी जेणेकरून आपणास जन माहिती अधिकारी यांच्याकडून आपणांस माहिती उपलब्ध करून देणे सोयीचे होईल ** |

** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (च) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

The RTI application, submitted that information sought is available on the website of the MERC and since the same is available in public domain, the PIO is not obliged to provide the same to the appellant under the RTI Act. As per the Hon'ble CIC decision No. CIC/YA/A/2014/000379/SB Dated 19.09.2016 in the matter of Shri. K. Lall Vs M. K. Bagri, Assistant Registrar of Companies.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-४००००५. दूरध्वनी क्र.०२२-२२१६३९६४/६५ /६९. **Email: anilkumar.ukey@merc.gov.in**

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी